माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००४०२९**

**अपिलार्थी श्री. समीर सॉलोमन लालझरे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
दादर विभाग, दादर पोलीस ठाणे इमारत, पहिला मजला
डब्ल्यु. एस. मटकर मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-४०००२८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-५)**
सागरी पोलीस ठाणे, २ रा माळा, माहिम रेती बंदर,
माहिम डेपोसमोर, मुंबई-१६

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.०९.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित(व्ही.सी.माध्यमाव्दारे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.०१.२०२२ | १४.०२.२०२२/२१.०३.२०२२ | ०१.०४.२०२२ | १३.०९.२०२२ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १९.१०.२०२२ रोजीच्या अर्जान्वये माहिती देण्यात आली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २१.०३.२०२२ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १३.०९.२०२२ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ३१.०१.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार दादर मध्ये रेल्वे, दादर पश्चिम रेल्वे व दादर रेल्वे स्टेशन या परिसरात दादर रेल्वे पोलीस ठाणे व शिवाजी पार्क पोलीस ठाणेच्या हद्दीत अनधिकृत झोपडपट्टीची ५ मुद्यांची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी, पोलीस उप आयुक्त, मध्ये परिमंडळ लोहमार्ग, मुंबई यांनी त्यांचे पत्र दि. १४.०२.२०२२ रोजी अपिलार्थीचा माहितीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये आर.टी.आय. सेल, अतिरिक्त विभागीय व्यवस्थापक (प्रशासन), पश्चिम रेल्वे, मुंबई मध्य मुंबई, जन माहिती अधिकारी, मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, दादर विभाग, मुंबई यांना हस्तांतरीत केला. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, दादर रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई यांनी दि. २१.०३.२०२२ रोजी अपिलार्थींना उत्तर दिले की, सदरची माहिती दादर रेल्वे पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत येत नाही. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०१.०४.२०२२ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०९.२०२२ रोजी प्रथम अपील अमान्य करुन निकाली काढलेले आहे.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी (व्ही.सी.माध्यमाद्वारे) व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, दादर विभाग उपस्थित असून त्यांनी असे सादर केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नाही.

पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक, दादर रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई यांची उपस्थिती आवश्यक आहे.

## आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १६.१०.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

२३-९-२०२४

**मुंबई**
**दिनांक : २३.०९.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**प्रत: जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, दादर रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई.**

निर्गमित
26 SEP 2024

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००४०२९**
**अपिलार्थी श्री. समीर सॉलोमन लालझरे**
**सुनावणी दिनांक : १६.१०.२०२४ (In continuation of order dt २३.०९.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | प्रतिनिधी उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

या प्रकरणी दिनांक २३.०९.२०२४ रोजी असे आदेशीत करण्यात आले होते की, पुढील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, दादर रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई यांची उपस्थिती आवश्यक आहे. या प्रकरणी दिनांक १६.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात येईल.

त्यानुषंगाने सदर सुनावणीसाठी व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित राहण्यासाठी अपिलार्थी यांना भायखळा जिल्हा कारागृहात लिंक पाठविण्यात आली होती. सुनावणीचे वेळी अपिलार्थी व्ही. सी. माध्यमावर उपस्थित नव्हते. कारागृह प्रशासनाशी वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

सुनावणीस दादर पोलीस ठाण्याचे जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यांनी आयोगास असे निवेदन केले की, सदर विषय हा महानगरपालिकेशी संबंधीत आहे.

दादर रेल्वे पोलीस ठाण्यास पाठविलेली नोटीस अपुऱ्या पत्त्याअभावी कार्यालयात परत आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास नमूद केले की, मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस स्टेशन या ठिकाणी सदर नोटीस पाठवावी लागेल.

## आदेश

**या प्रकरणी दिनांक ०६.११.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता सुनावणी घेण्यात येईल. त्यासाठी कार्यालयाने जन माहिती अधिकारी, मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे, १, लॅमिंग्टन रोड, रिलायन्स सुपर मार्केट जवळ, नवजीवन एरिया, दलाल इस्टेट, मुंबई सेंट्रल, मुंबई, ४०० ००८ या पत्त्यावर सुनावणीची नोटीस पाठवावी.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : १६.१०.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**प्रत:-** जन माहिती अधिकारी, मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे, १, लॅमिंग्टन रोड, रिलायन्स सुपर मार्केट जवळ, नवजीवन एरिया, दलाल इस्टेट, मुंबई सेंट्रल, मुंबई, ४०००००८.

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००४०२९**
**अपिलार्थी श्री. समीर सॉलोमन लालझरे (बंदी)**
**सुनावणी दिनांक : ०६.११.२०२४ (In continuation of order dt २३.०९.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि.२७.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि.२७.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त.) |

या प्रकरणी दिनांक १६.१०.२०२४ रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाने कार्यालयास आदेशीत केले होते की, जन माहिती अधिकारी, मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई सेंट्रल यांना सुनावणीची नोटीस पाठवावी.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित होते. आयोगाच्या आदेशाप्रमाणे कार्यालयाद्वारे जन माहिती अधिकारी, मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे, मुंबई सेंट्रल यांना पाठविलेली नोटीस कार्यालयास परत आलेली आहे. त्यामुळे सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. म्हणून या प्रकरणी दि. ११.१२.२०२४ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. कार्यालयाने जन माहिती अधिकारी , मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे-१, मुंबई सेंट्रल यांचे कार्यालयाशी दुरध्वनीद्वारे संपर्क करुन त्यांचे कार्यालयास पुन्हा नोटीस पाठविण्यात यावी.

**आदेश**

**या प्रकरणी दिनांक ११.१२.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता पुन्हा सुनावणी घेण्यात येईल**

**मुंबई**
**दिनांक : ०७.११.२०२४**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**